# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा



# नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी)

# सभा क्र. १३

- वार :- शनिवार
- दिनांक :- ०५.०४.२०२५
- वेळ :- सायंकाळी ०५.०० वाजता
- स्थळ :- साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे

# विषयावरील ठराव

# (इतिवृतांत)

**कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा**

सदर बझार, आर.टी.ओ. ऑफिस जवळ, सातारा

फोन नं. ०२१६२-२३०६३६, २३३००५

ईमेल - office@kbpcoes.edu.in

वेबसाईट - www.kbpcoes.edu.in

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

***नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १३. दि. ०५.०४.२०२५ इतिवृत्तांत***

**जा. क्र. ग.ब.स./सभा १३/२०२५/** **दि. - ०५.०४.२०२५**

**नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १३**

**दिनांक - ०५.०४.२०२५**

**वेळ - सायंकाळी ०५.०० वाजता**

**स्थळ - साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे**

या महाविद्यालयाची नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) ची १३ वी सभा **शनिवार दि. ०५.०४.२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता** मा. ना. दिलीप वळसे पाटील साहेब - चेअरमन नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केलेली आहे. तरी सर्व सन्माननीय सदस्यांनी सभेस उपस्थित राहून मार्गदर्शन करावे, ही विनंती.

**विषय – पत्रिका**

| विषय | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| **विषय क्र. १** | मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १२. दि. १८.०२.२०२५ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे व घेतलेल्या निर्णयाची माहिती देणे. | |
| **विषय क्र. २** | महाविद्यालयातील Center of Excellence in AI-IoT & Robotics Automation लॅबची स्थापना करण्यासाठी व येणाऱ्या खर्चाबाबत चर्चा करणे. | |
| **विषय क्र. ३** | महाविद्यालयातील IQAC Office and TPO Interview Cabins विभागाचे नूतनीकरण करणेसाठी व येणाऱ्या खर्चास परवानगी घेणे. | |
| **विषय क्र. ४** | महाविद्यालयातील खरेदी समिती बाबत चर्चा करणे. | |
| **विषय क्र. ५** | महाविद्यालयास ISO Certification घेण्यासाठी लागणाऱ्या फी ला परवानगी घेणे. | |
| **विषय क्र. ६** | **मा. चेअरमन यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.** | |

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी ... सातारा

**प्राचार्य तथा सचिव**
नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

प्रत - सर्व सन्मानीय सदस्य - नियामक मंडळ

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १३. दि. ०५.०४.२०२५ इतिवृतांत*

**जा. क्र. ग.ब.स./सभा १३/२०२५/** **दि. - ०५.०४.२०२५**

**नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १३**

**दिनांक - ०५.०४.२०२५**

**वेळ - सायंकाळी ०५.०० वाजता**

**स्थळ - साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा या महाविद्यालयाची नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) ची १३ वी सभा **शनिवार दि. ०५.०४.२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता** मा. ना. दिलीप वळसे पाटील साहेब - चेअरमन नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) यांचे अध्यक्षपदी संपन्न झाली. या सभेस खालील मान्यवर उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य –**

| अ.क्र. | सदस्य नाव | पद |
|---|---|---|
| १. | मा. ना. दिलीप वळसे - पाटील साहेब | चेअरमन |
| २. | मा. चंद्रकांत दळवी साहेब IAS (Retd.)<br>चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा | निमंत्रित |
| ३. | मा. विकास देशमुख साहेब IAS (Retd.)<br>सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा | सदस्य |
| ४. | मा. प्रतापराव पवार | सदस्य |
| ५. | डॉ. एस. एल.नलबलवार | सदस्य |
| ६. | मा. उदय जाधव | सदस्य |
| ७. | डॉ. सौ. एस. जे. मोदी | सदस्य |
| ८. | डॉ. सौ. एस. व्ही. माने | सदस्य |
| ९. | प्रा. डॉ. ए. सी. अत्तार | सदस्य / सचिव |

सर्वप्रथम सभेचे सदस्य सचिव तथा मा. प्राचार्य यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले आणि मा. ना. दिलीप वळसे पाटील साहेब महाविद्यालयाचे नियामक मंडळाचे चेअरमन यांच्या अध्यक्षतेखाली सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १३. दि. ०५.०४.२०२५ इतिवृतांत

## विषयावरील ठराव

**विषय क्र. १. :- मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १२. दि. १८.०२.२०२५ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे व घेतलेल्या निर्णयाची माहिती देणे.**

**टाचण** :- मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १२, दि. १८.०२.२०२५ रोजीच्या इतिवृत्तांचे अवलोकन करून तो मंजूर करणेत यावा अशी विनंती आहे. तसेच मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १२, दि. १८.०२.२०२५ मध्ये घेण्यात आलेल्या निर्णयावरील कार्यवाही ठरावाअनुक्रमे खालील प्रमाणे आहे.

| ठराव | निर्णय | निर्णयावरील कारवाई |
|---|---|---|
| ठराव क्र.०१. | मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र ११ दि. १९.०८.२०२४ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे व घेतलेल्या निर्णयाची माहिती देणे. | मागील सभेचा इतिवृत्तांत वाचून सर्व सहमतीने कायम करणेत आला. |
| ठराव क्र.०२ | महाविद्यालयातील उल्लेखनीय बाबींची माहिती देणे. | महाविद्यालयातील विविध उल्लेखनीय उपक्रमाची सभेस माहिती दिली व सभेने आवलोकन केले. |
| ठराव क्र.०३. | महाविद्यालयातील सेवकांना सातवा वेतन आयोग लागू करणेबाबत चर्चा करणे. | सभेने चर्चा करून महाविद्यालयातील कार्यरत सेवकांना सातवा वेतन आयोग लागू करण्यास परवानगी दिली. |
| ठराव क्र.०४ | महाविद्यालयास Autonomy घेण्याबाबत चर्चा करणे. | सभेने चर्चा करून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये महाविद्यालयास Autonomy घेण्यास व येणाऱ्या खर्चास परवानगी दिली. |
| ठराव क्र.०५ | सत्य शोधक (Fact Finding) च्या अहवाला बाबत चर्चा करणे. | सभेने अवलोकन केले |
| ठराव क्र.०६ | महाविद्यालयात नवीन खरेदी समिती गठन करणेबाबत. | सभेने चर्चा करून मा. सचिव साहेब रयत शिक्षण संस्था सातारा यांच्या समवेत चर्चा करून समितीचे गठन करावे असे सूचित केले. |
| ठराव क्र.०७ | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या Annual Quality Assurance Report (AQAR) ला मान्यता घेणे. | सभेने चर्चा करून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या Annual Quality Assurance Report (AQAR) ला मान्यता दिली. |
| ठराव क्र.०८ | महाविद्यालयामध्ये नवीन Robotics Lab स्थापन करणेबाबत चर्चा करणे. | याबाबत सविस्तर प्रस्ताव तयार करून पुढील सभेमध्ये विषय घेण्यात यावा असे सूचित केले. |
| ठराव क्र.०९ | शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता ADHOC शिक्षकांची संस्थेमार्फत नेमणूक करणेस परवानगी मिळणेबाबत व त्यांच्या पगाराविषयी धोरण ठरविण्याबाबत. | ADHOC शिक्षकांचा रिक्त पदानुसार सविस्तर प्रस्ताव तयार करून व पुढील सभेमध्ये विषय घेण्यात यावा असे सूचित केले. |
| ठराव क्र.१० | शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांनी सादर केलेल्या अर्जाबाबत चर्चा करणे. | **मुद्दा क्र. १** नुसार महाविद्यालयातील सर्व ADHOC सेवकांचा एकत्रित पगार वाढ करण्याचा प्रस्ताव तयार करावा असे सूचित केले.<br>**मुद्दा क्र. २** - संस्था कार्यालयास पत्रव्यवहार करून पाठपुरावा करावा. |

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १३. दि. ०५.०४.२०२५ इतिवृतांत*

| | | |
|---|---|---|
| | | **मुद्दा क्र. ३** - नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी. |
| ठराव क्र.११ | सेवानिवृत्त झालेल्या सेवकांनी विविध आर्थिक मागणीसाठी केलेल्या अर्जाबाबत योग्य निर्णय घेणेबाबत. | महाविद्यालयातील सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांना कोणताही आर्थिक फरकाचा लाभ विविध आर्थिक बाबी देण्यात येऊ नयेत असे सर्वानुमते ठरले. |
| ठराव क्र.१२ | वाय. सी कॉलेज सातारा या महाविद्यालयातील विद्यार्थी या महाविद्यालयाचे वसतीगृह सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या वर्षात वापरत असलेल्या वसतीगृहाबाबत. | याबाबत मा. सचिव साहेब यांच्या समवेत सविस्तर चर्चा करून वाय.सी. कॉलेज यांना कळवावे. |
| ठराव क्र.१३ | डॉ. आलदर दिलीप एस. यांच्या महाविद्यालयातील वर्तणूकीबाबत. | सभेने चर्चा करून संस्था स्थरावर योग्य ती कारवाही करणेत यावी. |
| ठराव क्र.१४ | **महाविद्यालयातील प्रशासकीय व आर्थिक बाबी विषयी मंजुरी घेणे.** | -- |
| ठराव क्र.१४.१ | महाविद्यालयातील कार्यरत असलेले १७ शिक्षकेत्तर सेवकांना २४ वर्षाची कालबद्ध पदोन्नतीचा माहे जानेवारी २०२४ पासून फरक देण्याबाबत चर्चा करणे. | महाविद्यालयातील कार्यरत असलेले १७ शिक्षकेत्तर सेवकांना २४ वर्षाची कालबद्ध पदोन्नतीचा माहे जानेवारी २०२४ पासून फरक देण्यास सभेने परवानगी दिली, त्यानुसार सेवकांना फरक अदा करणेत आला आहे. |
| ठराव क्र.१४.२ | Artificial Intelligence & Data Science या नवीन विद्याशाखेस आवश्यक असणाऱ्या साहित्यांची खरेदी करणेस परवानगी घेणेबाबत.<br>१.बेंचेस २. संगणक ३. फर्निचर | सविस्तर प्रस्ताव तयार करून पुढील सभेमध्ये विषय ठेवावा असे सभेने सूचित केले. |
| ठराव क्र.१४.३ | महाविद्यालयातील IQAC Office and TPO Interview Cabins विभागाचे नूतनीकरण करणेसाठी व येणाऱ्या खर्चास परवानगी घेणे. | सविस्तर प्रस्ताव तयार करून पुढील सभेमध्ये विषय ठेवावा असे सभेने सूचित केले. |
| ठराव क्र.१४.४ | महाविद्यालयातील सुरक्षा रक्षक यांची ऑनलाईन द्वारे निवेदाद्वारे निवड करणेत आली होती सदर नेमणूक कालावधी माहे सप्टेंबर २०२४ रोजी पूर्ण झाला असून त्यापुढील मानधन दरमहा ठरविलेल्या दरानुसार अदा करणेस परवानगी मिळावी. | महाविद्यालयातील सुरक्षा रक्षक यांना मागील दरानुसार दरमहा मानधन देण्यास सभेने परवानगी दिली. |
| ठराव क्र.१४.५ | **मा. चेअरमन यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.** | -- |

**वरील नुसार मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १२ मधील सर्व ठराव मा. प्राचार्य यांनी सभेस सांगितले व सभेने चर्चा करून अवलोकन केले.**

**सूचक :- डॉ. सौ. माने एस. व्ही.**
**अनुमोदक :- मा. उदय जाधव**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १३. दि. ०५.०४.२०२५ इतिवृतांत*

**विषय क्र. ०२ - महाविद्यालयातील Center of Excellence in AI-IoT & Robotics Automation लॅबची स्थापना करण्यासाठी व येणाऱ्या खर्चाबाबत चर्चा करणे.**

**प्रस्ताव - ०२** -Center of Excellence in AI-IoT & Robotics Lab ची माहिती घेण्यासाठी महाविद्यालयातील चार शिक्षक सेवक Autofina Robotics Centre of Excellence Lab at Government Polytechnic, Pune येथे भेट देण्यास गेले होते. त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवाला नुसार महाविद्यालयामध्ये Robotics Lab तयार केल्यास महाविद्यालयातील व संस्थेच्या विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होऊ शकतो.

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा मधील प्राध्यापक डॉ. वाय. के. कणसे, डॉ. पी. एल. जाधव, प्रा. जी. डी. दांगट आणि प्रा. ए. एम. शेख यांनी विद्या प्रतिष्ठानचे कमलनयन बजाज अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान संस्था, बारामती येथे २३ फेब्रुवारी २०२४ रोजी भेट दिली. या भेटीचा मुख्य उद्देश संस्थेमध्ये सुरु असलेल्या नवीन उपक्रम, इनक्युबेशन आणि स्टार्टअप धोरणांबद्दल माहिती घेणे हा होता. भेटीदरम्यान, प्राध्यापकांनी संस्थेने CSR (Corporate Social Responsibility) उपक्रमांतर्गत स्थापन केलेली विविध उत्कृष्टता केंद्रे (Centre of Excellence - CoE) पाहिले यावरून प्रेरणा घेऊन, प्राचार्य डॉ. ए. सी. अत्तार यांच्याशी चर्चा करत महाविद्यालयामध्ये असेच एक उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्याची संकल्पना मांडली.

यानंतर, दि. १८ फेब्रुवारी २०२५ रोजी विद्या प्रतिष्ठानचे कमलनयन बजाज अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान संस्था, बारामती येथे संस्था पदाधिकारी यांच्या समवेत भेट देण्यात आली सदर भेटीच्या वेळी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन मा. चंद्रकांत दळवी IAS (Retd.), सचिव मा. विकास देशमुख IAS (Retd.), मा. प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, सह-सचिव (उ.शि), प्राचार्य डॉ. ए. सी. अत्तार, आणि प्रा. जी. डी. दांगट यांची उपस्थिती होते.

विद्या प्रतिष्ठानचे डिजिटल मॅन्युफॅक्चरिंग आणि रोबोटिक्स ऑटोमेशन उत्कृष्टता केंद्र (Centre of Excellence) पाहणी केली यामध्ये रोबोटिक्स, 3D प्रिंटिंग, इंटरनेट ऑफ थिंग्स (IoT) आणि सिम्युलेशन प्रयोगशाळा यांचा समावेश आहे. सदर केंद्र हे SimuSoft Technologies, Pune यांच्या सहकार्याने स्थापन करण्यात आले आहे. या केंद्राच्या अत्याधुनिक सुविधा पाहून, संस्था पदाधिकारी यांनी SimuSoft Technologies, Pune यांच्याशी चर्चा करत महाविद्यालयामध्ये AI-IoT आणि रोबोटिक्स ऑटोमेशन उत्कृष्टता केंद्र (Centre of Excellence) रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा येथे सुरु करावे असे सुचविण्यात आले.

त्यानुसार SimuSoft Technologies यांच्याकडून सेंटर स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव आणि कोटेशन घेण्यात आले, मा. प्राचार्य डॉ. ए. सी. अत्तार यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलीकॅम्युनिकेशन इंजिनिअरिंग आणि कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग विभागातील तज्ञ प्राध्यापकांची समिती गठीत केली. या समितीत डॉ. अभिजीत वंटे, डॉ. वाय. के. कणसे आणि प्रा. जी. डी. दांगट यांचा समावेश करण्यात आला. समितीने विस्तृत चर्चेनंतर, AI-ML आणि HPC (High-Performance Computing) प्रयोगशाळा प्रस्तावामध्ये समाविष्ट करण्याची शिफारस केली.

त्यानुसार, SimuSoft Technologies, Pune मधील श्री. सुनील चौरे यांच्याशी संपर्क साधून दि. ०९ मार्च २०२५ रोजी प्रस्तावावर अंतिम चर्चा करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली. प्राचार्य डॉ. ए. सी. अत्तार यांच्या मार्गदर्शनाखाली, समितीने प्रस्तावात आवश्यक सुधारणा सुचवल्या आणि त्यानुसार अंतिम प्रस्ताव सादर करण्यात आला.

मेकॅनिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड टेलीकॅम्युनिकेशन इंजिनिअरिंग आणि कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांच्याकडून कमीत कमी शुल्क आकारून या उत्कृष्टता केंद्राचे (CoE) मध्ये त्यांची इंटर्नशिप पूर्ण करू शकतील. तसेच रयत शिक्षण संस्थेच्या इतर महाविद्यालयातील आयटीआय, पॉलिटेक्निक, बीसीए आणि एमसीए विद्यार्थ्यांना सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये कमीत कमी शुल्क आकारून प्रशिक्षण घेता येईल.

**तांत्रिक माहिती** :-रयत शिक्षण संस्थेच्या "कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा" मध्ये स्थापन करण्यात येणाऱ्या "कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), इंटरनेट ऑफ थिंग्स (IoT) आणि रोबोटिक्स ऑटोमेशनच्या उत्कृष्टता केंद्र" (Center of Excellence - CoE) संबंधित माहिती पुढीलप्रमाणे -

१. **Advanced AI-ML आणि HPC (High-Performance Computing)**: मशीन लर्निंग, डेटा ॲनालिटिक्स आणि एआय मॉडेल्स तयार करण्यासाठी प्रगत संसाधने

२. **ड्रोन तंत्रज्ञान**: औद्योगिक क्षेत्रांसाठी स्वायत्त ड्रोन ऑपरेशन्सचे प्रशिक्षण आणि संशोधन.

३. **3D प्रिंटिंग**: जलद प्रोटोटायपिंग आणि मॅन्युफॅक्चरिंग प्रक्रियांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण.

४. **मेकॅट्रॉनिक्स सिस्टम**: मेकॅनिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड टेलीकॅम्युनिकेशन इंजिनिअरिंग आणि कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग यांचे एकत्रित प्रशिक्षण.

५. **PLC आणि सिम्युलेशन**: औद्योगिक स्वयंचलित प्रणालींच्या विकास आणि नियंत्रणासाठी प्रशिक्षण.

६. **ॲडव्हान्स्ड इलेक्ट्रिकल इंडस्ट्रियल कंट्रोल**: औद्योगिक नियंत्रण प्रणालींचे प्रायोगिक प्रशिक्षण आणि संशोधन.

**उत्कृष्टता केंद्राचे (CoE) उद्दिष्ट आणि भविष्यातील दृष्टीकोण -**

- सदर सुविधेत उपलब्ध असलेली उपकरणे आणि सॉफ्टवेअर उद्योगाच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कन्सल्टन्सी कार्याला प्रोत्साहन देतील. यामुळे भविष्यात कन्सल्टन्सी आणि औद्योगिक सहकार्यातून उत्पन्न निर्माण होईल.
- महाविद्यालयातील प्रवेश वाढविण्यास हे उत्कृष्टता केंद्राचा (CoE) फायदा होईल. यामुळे रोजगार निर्मिती, नवकल्पना आणि तांत्रिक प्रगती होईल.
- ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अद्ययावत तंत्रज्ञानामध्ये प्राविण्य मिळवून देण्यासाठी व उद्योगांना नव्या तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी या केंद्राचा उपयोग होईल. हा उपक्रम भविष्यात विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानामध्ये प्राविण्य मिळवण्यासाठी तसेच स्थानिक उद्योगांना सहकार्य करण्यासाठी एक प्रभावी पाऊल ठरेल.
- या सुविधेमध्ये स्थापित 3D प्रिंटिंग आणि CNC मशीन असल्याने विद्यार्थ्यांना तसेच आसपासच्या उद्योगांना याचा फायदा होईल व त्यांना उत्पादन विकासासाठी प्रेरित केले जाईल. यामुळे औद्योगिक आणि उद्योजकतेच्या वाढीस चालना मिळेल.

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी सातारा

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १३. दि. ०५.०४.२०२५ इतिवृतांत*

यासोबतच रयत शिक्षण संस्थेच्या तांत्रिक शिक्षणाला चालना देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर सक्षम करण्यासाठी हे केंद्र अतिशय मोलाचे योगदान ठरेल. सदर केंद्र कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाला महाराष्ट्रातील डिजिटल मॅन्युफॅक्चरिंग आणि रोबोटिक्स ऑटोमेशन क्षेत्रात अग्रेसर बनवेल.

**महाविद्यालयातील प्रत्येक विभागासाठी होणारे फायदे:**

१. **मेकॅनिकल इंजिनीअरिंग विभाग:-** ड्रोन तंत्रज्ञान आणि 3D प्रिंटिंग यासारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित संशोधन आणि प्रयोगशाळा उपलब्ध होईल. औद्योगिक ऑटोमेशन, मेकॅट्रोनिक्स सिस्टम आणि प्रोग्रामेबल लॉजिक कंट्रोलर (PLC) तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष ज्ञान मिळेल. डिजिटल मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात विद्यार्थ्यांना नवे कौशल्य मिळेल, जे त्यांना उद्योग ४.० साठी तयार करेल.

२. **इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकॅम्युनिकेशन इंजिनीअरिंग विभाग:-** इंटरनेट ऑफ थिंग्स (IoT) आणि रोबोटिक्स ऑटोमेशन यासारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर संशोधन करण्याची संधी मिळेल. सेंसर आधारित प्रणाली, वायरलेस नेटवर्किंग आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) आधारित स्मार्ट ऑटोमेशन वर विशेष भर दिला जाईल. औद्योगिक क्षेत्रात स्मार्ट तंत्रज्ञान आणि ऑटोमेशनसाठी आवश्यक असलेले कौशल्य विद्यार्थ्यांना मिळेल.

३. **संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकी विभाग:-** मशीन लर्निंग (ML), कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि उच्च कार्यक्षम संगणन (HPC) प्रयोगशाळा यामुळे डेटा ॲनालिटिक्स आणि स्मार्ट ऑटोमेशनमध्ये प्रगती होईल. औद्योगिक आणि शैक्षणिक संशोधनासाठी AI आणि IoT इंटिग्रेशन, स्वयंचलित डेटा प्रोसेसिंग आणि IoT सोल्यूशन्स तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळेल. स्टार्टअप आणि संशोधनासाठी अधिक संधी निर्माण होतील.

**आर्थिक तरतूद :-** कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), इंटरनेट ऑफ थिंग्स (IoT) आणि रोबोटिक्स ऑटोमेशनच्या उत्कृष्टता केंद्र (Center of Excellence - CoE) हे केंद्र उभारण्यासाठी आवश्यक साधनसामग्री, प्रयोगशाळा उपकरणे आणि सॉफ्टवेअर यांचा खर्च SimuSoft Technologies, Pune यांच्याकडून

प्राप्त कोटेशननुसार Center of Excellence हे केंद्र महाविद्यालयात स्थापन करणेसाठी रक्कम रु. १,६३,२०,०००/- व १८ % GST, २% Freight Charges व Infrastrucutre Development करिता अंदाजे २०,००,०००/- असा एकूण २,२०,००,००० /- दोन कोटी वीस लाख एवढा खर्च येणार असून यापैकी १,५०,००,०००/- (एक कोटी पन्नास लाख) हे CSR (Corporate Social Responsibility) अंतर्गत मिळण्याची शक्यता आहे. यासाठी आवश्यक असणाऱ्या रक्कमेची तरतुद महाविद्यालयाकडे आहे.

**प्राचार्य शिफारस :-** कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), इंटरनेट ऑफ थिंग्स (IoT) आणि रोबोटिक्स ऑटोमेशनच्या उत्कृष्टता केंद्र (Center of Excellence - CoE) करिता महाविद्यालयाने २७९ Sq. Meters (३००३ Sq. Foot) जागा निश्चित केली आहे. भविष्यातील गरज लक्षात घेऊन आणखी २६५.४२ Sq. Meters (२८५६ Sq. Foot) राखीव क्षेत्र विस्तारासाठी उपलब्ध आहे. यामुळे भविष्यात अद्ययावत संशोधन प्रयोगशाळा, स्टार्टअपसाठी विशेष वर्कस्पेस आणि नव्या तांत्रिक सुविधा विकसित

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

करता येतील. हा प्रकल्प केवळ एक प्रयोगशाळा नसून, महाविद्यालयाच्या भविष्यातील तांत्रिक उन्नतीसाठी एक महत्वपूर्ण योगदान ठरणार आहे.

SimuSoft Technologies, Pune हे या प्रकारच्या Center of Excellence - CoE निर्मितीमध्ये अग्रेसर आणि एकमेव संस्था आहे. त्यांनी याआधी विद्या प्रतिष्ठानच्या डिजिटल मॅन्युफॅक्चरिंग आणि रोबोटिक्स ऑटोमेशन Center of Excellence - CoE यशस्वी स्थापना केली आहे. त्यामुळे SimuSoft Technologies यांच्या व रयत शिक्षण संस्थेच्या सहकार्याने हे Center of Excellence - CoE महाविद्यालयात उभारण्यात यावे असे सभेस विनंती आहे.

**ठराव** - कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), इंटरनेट ऑफ थिंग्स (IoT) आणि रोबोटिक्स ऑटोमेशनच्या उत्कृष्टता केंद्र (Center of Excellence - CoE) महाविद्यालयात स्थापन करणेसाठी सभेने चर्चा करून सदर सेंटर स्थापन करण्यासाठी लागणारी Equitment व Infrastrucutre Development साठी अंदाजे एकूण रक्कम २,२०,००,००० /-(दोन कोटी वीस लाख) एवढा खर्चास परवानगी दिली.

**सूचक :- मा. प्रतापराव पवार**

**अनुमोदक :- मा. उदय जाधव**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १३. दि. ०५.०४.२०२५ इतिवृत्तांत

**विषय क्र. ३ :- महाविद्यालयातील IQAC Office and TPO Interview Cabins विभागाचे नूतनीकरण करणेसाठी व येणाऱ्या खर्चास परवानगी घेणे.**

**प्रस्ताव** :- महाविद्यालयात AICTE, DTE, NBA, NAAC, विद्यापीठ व संस्था यांच्या मार्फत विविध समित्या महाविद्यालयात भेट देण्यास येतात. त्यासाठी महाविद्यालयातील IQAC विभागाचे ऑफिस अद्यावत असणे गरजेचे आहे, कारण या विभागामार्फत सर्व विभागांतील कागद पत्रांची प्रभावीपणे सादरीकरण वरील सर्व संस्थाना होत असते. त्याअनुषंगाने सदर IQAC विभागासाठी अद्यावत मिटिंग हॉल असणे आवश्यक आहे. तसेच महाविद्यालयातील विविध विभागातील विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यामध्ये Placement होण्याच्या दृष्टीने महाविद्यालयामध्ये नामांकित कंपन्यांना संपर्क करून महाविद्यालयात बोलावले जाते त्यानुसार नामांकित कंपन्यामार्फत विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयात मुलाखीत व परीक्षा घेण्यात येतात. याकरिता मुलाखत दालन (Interview Cabins) असणे आवश्यक आहे. तरी महाविद्यालयात IQAC Office and TPO Interview Cabins चे नूतनीकरण करण्यास सभेची परवानगी मिळावी.

**तांत्रिक माहिती :- IQAC Office and TPO Interview cabin साठीची तांत्रिक माहिती खालील प्रमाणे- (आर्किटेक्ट ड्रॉइंगनुसार बसण्याची क्षमता आणि क्षेत्रफळ तपशील)**

| Sr. No | Name of Room/Passage | Area in Sqm | Seating Capacity in No. of Chairs |
|---|---|---|---|
| 1. | Cabin 1 / Group Discussion Room with attached toilet | 30.375 | 11 |
| 2. | Cabin 2 / Interview Cabin with attached toilet | 22.837 | 04 |
| 3 | Cabin 2 Waiting area | 7.298 | 04 |
| 4. | IQAC Meeting Room | 49.50 | 25 |
| 5. | Pantry | 8.825 | - |
| 6. | Passage | 31.675 | - |
| | **Total** | **150.51** | |
| 7. | Area of Brickwork | 8.328 | |
| | **Total Area** | **158.84** | - |

**इलेक्ट्रिकल साहित्यांचा तपशील**

| अ. क्र. | साहित्य | संख्या |
|---|---|---|
| 1. | AC | 4 |
| 2. | 14W LED Light | 30 |
| 3. | 7W LED Light | 21 |
| 4. | Ceiling Fan | 7 |
| 5. | Exhaust Fan | 2 |
| 6. | Speaker | 6 |

**फर्निचर साहित्यांचा तपशील**

| Sr. No | Material Description | Qty. | Location |
|---|---|---|---|
| 1. | Meeting Executive Table (3 x 0.90 x 0.75 m) | 1 | IQAC Meeting Room |
| 2. | Meeting Table (4 x 0.75 x 0.75 m) | 2 | |
| 3. | Cabinet (1.20 x 0.60 x 2.40 m) | 6 | IQAC Meeting Room + Interview Cabin |
| 4. | Executive Table (2.10 x 0.90 x 0.75 m) | 1 | Interview Cabin |
| 5. | Executive Table (3 x 1.20 x 0.75) | 1 | GD Room |

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १३. दि. ०५.०४.२०२५ इतिवृतांत

**आर्थिक तरतूद :-** IQAC Office and TPO Interview cabin बाबतची आर्थिक माहिती खालील प्रमाणे -

| Sr. No | Work Details | Amount in Rupees |
|---|---|---|
| 1 | Civil Work | 15,55,129.64 |
| 2 | Electrical Work | 5,53,028.45 |
| 3 | Furniture | 6,63,860.00 |
| | Total | 27,72,018.09 /- |

वरील तक्त्यानुसार महाविद्यालयातील IQAC Office and TPO Interview Cabins च्या विभागाचे नूतनीकरण करणेसाठी व येणाऱ्या खर्चास महाविद्यालयाकडे आर्थिक तरतूद आहे.

**प्राचार्य शिफारस :-** महाविद्यालयात विविध शिखर संस्था मार्फत विविध समित्या महाविद्यालयास भेट देण्यास व कागदपत्राची तपासणी करणेसाठी येत असतात. यामध्ये महाविद्यालयात कागदपत्रे तपासणी करणेसाठी व महाविद्यालयाची माहिती सादर करण्यासाठी एक सुसज्ज IQAC Office महाविद्यालयात असणे आवश्यक आहे. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विविध कंपन्यामध्ये व नामंकित कंपन्यामध्ये प्लेसमेंट होण्यासाठी महाविद्यालयात TPO Interview Cabins असणे आवश्यक असल्याने महाविद्यालयातील IQAC Office and TPO Interview Cabins च्या विभागाचे नूतनीकरण करणेसाठी व येणाऱ्या खर्चास सभेने परवानगी द्यावी.

**ठराव -** महाविद्यालयातील IQAC Office and TPO Interview Cabins विभागाचे नूतनीकरण करणेसाठी सभेने चर्चा करून सदर विभागाचे नूतनीकरण करण्यास व येणाऱ्या अंदाजे एकूण रक्कम ३०,८५,४६५/- खर्चास परवानगी दिली.

**सूचक :- प्रा. डॉ. सौ. एस. व्ही. माने**
**अनुमोदक :- मा. विकास देशमुख साहेब**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १३. दि. ०५.०४.२०२५ इतिवृतांत*

**विषय क्र. ४ :- महाविद्यालयातील खरेदी समिती बाबत चर्चा करणे.**

**प्रस्ताव** :- महाविद्यालयामध्ये विविध विभागातील साहित्य अथवा नवीन बांधकाम, नूतनीकरण करणेसाठी खरेदी समिती असणे आवश्यक आहे. त्यानुसार महाविद्यालयात खरेदी समिती गठीत करण्यात आली होती. परंतु, रयत शिक्षण संस्थेच्या सत्य शोधक समितीच्या (Fact Finding) अहवालानुसार महाविद्यालयातील खरेदी समिती नवीन तयार करण्यास सुचविले आहे. त्यानुसार महाविद्यालयातील मागील नियामक मंडळाची सभा क्र. १२ दि. १८.०२.२०२५ रोजी झालेल्या सभेमधील चर्चेनुसार महाविद्यालयातील खरेदी समिती बाबत मा. सचिव साहेब, रयत शिक्षण संस्था,सातारा यांच्या मार्गदर्शनानुसार इंडस्ट्री प्रतिनिधी यांचे नाव निश्चित करण्यात आले आहे. खालील प्रमाणे महाविद्यालय खरेदी समिती गठीत करण्यात आलेली आहे त्यास सभेची परवानगी मिळावी.

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | प्रि. डॉ. ए. सी. अत्तार (प्राचार्य) | चेअरमन |
| २ | श्री. वंसत गुलाबराव फडतरे (इंडस्ट्री प्रतिनिधी) | सदस्य |
| ३ | श्री. धैर्यशील भोसले (इंडस्ट्री प्रतिनिधी) | सदस्य |
| ४ | संबधित विभागप्रमुख | सदस्य |
| ५ | प्रा. दिग्विजयसिंह भास्करराव कदम (शिक्षक प्रतिनिधी) | सदस्य |
| ६ | प्रा. शरदचंद्र श्रीकांत पाटील (शिक्षक प्रतिनिधी) | सदस्य |
| ७ | डॉ. युवराज कृष्णराव कणसे (शिक्षक प्रतिनिधी) | सदस्य सचिव |

**प्राचार्य शिफारस** :- वरील तक्त्याप्रमाणे महाविद्यालयातील नवीन खरेदी समिती गठीत करण्यास व सदर सभेमार्फत महाविद्यालयातील विविध साहित्य व इतर बाबी खरेदी करण्यास सभेची परवानगी मिळावी.

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा



**ठराव** - महाविद्यालयातील विविध विभागातील साहित्य अथवा नवीन बांधकाम, नूतनीकरण करणेसाठी खरेदी समिती असणे आवश्यक आहे त्यानुसार खरेदी समिती स्थापन करणेसाठी सभेमध्ये चर्चा करण्यात आली. वरील नुसार गठीत करण्यात आलेल्या कमिटीमध्ये एक शिक्षक प्रतिनिधीचे नाव कमी करून आर्थिक तज्ञ (Financial Expert) यांची निवड करावी असे सभेने सूचित केले. त्यानुसार खालील प्रमाणे महाविद्यालयातील खरेदी समिती स्थापन करण्यात आली व सभेने त्यास परवानगी दिली.

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | प्रि. डॉ. ए. सी. अत्तार (प्राचार्य) | चेअरमन |
| २ | श्री. वंसत गुलाबराव फडतरे (इंडस्ट्री प्रतिनिधी) | सदस्य |
| ३ | श्री. धैर्यशील भोसले (इंडस्ट्री प्रतिनिधी) | सदस्य |
| ४ | श्री. प्रफुल्ल शहा (आर्थिक तज्ञ) | सदस्य |
| ५ | संबधित विभागप्रमुख | सदस्य |
| ६ | प्रा. दिग्विजयसिंह भास्करराव कदम (शिक्षक प्रतिनिधी) | सदस्य |
| ७ | डॉ. युवराज कृष्णराव कणसे (शिक्षक प्रतिनिधी) | सदस्य सचिव |

**सूचक** :- **मा. विकास देशमुख साहेब**
**अनुमोदक** :- **मा. प्रतापराव पवार**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ५ :- महाविद्यालयास ISO Certification घेण्यासाठी लागणाऱ्या फी ला परवानगी घेणे.**

**प्रस्ताव** :- ISO Ccertification मुळे महाविद्यालयाला अनेक शैक्षणिक व इतर फायदे मिळू शकतात, विशेषतः महाविद्यालयास NAAC (नॅशनल असेसमेंट ॲण्ड ॲक्रेडीशेन कौन्सिल) च्या मान्यता प्रक्रियेचा विचार केला जातो त्यावेळी महाविद्यालयास ISO Ccertification आहे का याची तपासणी केली जाते, त्यामुळे त्याचा NAAC नामांकन मिळण्यासाठी फायदा होऊ शकतो. तसेच खालील प्रमाणे विविध मुद्द्याहीन ISO Certification बाबत होणारे फायदे -

१. **सुधारित गुणवत्ता व्यवस्थापन** - ISO Certification हे महाविद्यालयातील व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित व सुनिश्चित करते की महाविद्यालय शिक्षण आणि संख्यात्मक व्यवस्थापनाच्या जागतिक मानकांचे पालन करते.

२. **सतत सुधारणाचे पुरावे** - ISO Certification आणि NAAC या दोन्ही शिखर संस्था व्यवस्थापनाची सुधारणा करण्यावर लक्ष केंद्रित करतात. ISO Certification साठी नियतकालिक पुनरावलोकन आणि मुल्यांकने आवश्यक आहेत जी शिक्षण आणि पायाभूत सुविधांमध्ये उच्च दर्जा विकसित करण्यासाठी उपयोग होतो.

३. **सुधारित संसाधन व्यवस्थापन** - ISO Certification मध्ये शिक्षक, सुविधा आणि वित्त यासह कार्यक्षम संसाधन व्यवस्थापन समाविष्ट आहे. NAAC संसाधन वापर आणि संस्थात्मक शास्वततेला महत्त्वपूर्ण महत्त्व देते आणि ISO Standards हे सुनिश्चित करतात.

४. **विद्यार्थी केंद्रित दृष्टीकोनावर लक्ष केंद्रित** - ISO Standards शिक्षणासाठी विद्यार्थी - केंद्रित दृष्टीकोणाला प्रोत्साहन देतात ज्यामध्ये अभिप्राय यंत्रणा, समर्थन प्रणाली आणि गुणवत्ता हमी यांचा समावेश आहे.

**आर्थिक तरतूद** :- ISO Certification घेण्यासाठी लागणारी फी महाविद्यालयाकडे उपलब्ध आहे.

**प्राचार्य शिफारस** :- महाविद्यालयास ISO Certification घेतल्याने महाविद्यालयास NAAC मान्यता प्रक्रीयेदरम्यान उच्च श्रेणी किंवा चांगले रँकिंग मिळण्याची शक्यता असते. तसेच महाविद्यालयातील शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजा मध्ये गुणवत्ता आणि सतत सुधारणा करण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांना व महाविद्यालयास त्याचा फायदा होऊ शकतो. त्यामुळे महाविद्यालयास ISO Certification घेण्यासाठी व त्यासाठी लागणाऱ्या फी ला सभेची परवानगी मिळावी.

**ठराव** - महाविद्यालयास ISO Certification घेण्यासाठी सभेमध्ये चर्चा करण्यात आली. ISO Certification घेतल्याने महाविद्यालयास NAAC मान्यता प्रक्रीयेदरम्यान उच्च श्रेणी किंवा चांगले रँकिंग मिळण्याची शक्यता असते. तसेच महाविद्यालयातील शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजा मध्ये गुणवत्ता आणि सतत सुधारणा करण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांना व महाविद्यालयास त्याचा फायदा होऊ शकतो. यासर्व बाबींचा विचार करून सभेने चर्चा करून ISO Certification घेण्यासाठी मान्यता दिली व ISO Certification घेण्यासाठी लागणाऱ्या फी परवानगी दिली.

**सूचक :- डॉ. सौ. मोदी एस. जे.**
**अनुमोदक :- मा. उदय जाधव**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**प्राचार्य तथा सचिव**
नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा